# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.07.2025** **वारःशुक्रवार**

---

भारत जागतिक मूल्य साखळीतील एक विश्वासार्ह भागीदार आणि अस्थिर जगासाठी एक स्थिर आधार ठरण्याच्या योग्य मार्गावर असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं प्रतिपादन.

ॲक्सिओम-४ मोहिमेचा परतीचा प्रवास १४ जुलै रोजी सुरू होणार

१ जुलै २०२५ पर्यंत अद्ययावत केलेल्या मतदार यादीच्या आधारे महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका
आणि
मानव-हत्ती संघर्षाच्या वाढत्या समस्येला तोंड देण्यासाठी, आसाम सरकारची गज मित्र योजना.

**<u>अर्थव्यवस्था-धनखड</u>**

क मूल्य साखळीतील एक विश्वासू भागीदार आणि अस्थिर जगासाठी एक स्थिर भक्कम आधार ठरण्याच्या योग्य मार्गावर असल्याचं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं CII-ITC शाश्वतता पुरस्कार समारंभात ते काल बोलत होते. उपराष्ट्रपती म्हणाले की, सध्या जगात गोंधळ आणि अशांतता आहे. जागतिक व्यवस्थेत सुधारणा होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. पुरवठा साखळीत व्यत्यय येत आहे. अशा परिस्थितीत, भारत हा एक प्रमुख आवाज आहे. भारताच्या शाश्वत विकासाच्या विकासावर प्रकाश टाकताना धनखड म्हणाले की, भारतात जगाच्या एक षष्ठांश लोकसंख्या नांदते, भारत जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून राष्ट्राचा विकास कसा व्हावा याचा भारताने आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे.
त्यांनी भारतीय उद्योगांना अक्षय ऊर्जा, हरित हायड्रोजन, वर्तुळाकार अर्थव्यवस्था प्रारूप आणि कार्बन बाजारपेठांमध्ये गुंतवणूक करून हरित क्रांतीचे पथदर्शी होण्याचं आवाहन केलं.

**<u>ॲक्सीओम</u>**

ॲक्सिओम-४ मोहिमेतील भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्लासह इतर तीन सदस्यांचा परतीचा प्रवास १४ जुलै रोजी सुरू होणार असल्याचं नासानं जाहीर केलं आहे. हे यान पॅसिफिक महासागरात कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ उतरवण्यात येईल. ग्रुप कॅप्टन शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात १४ दिवसांच्या मोहिमेवर आहेत. ते आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे पहिले तर अवकाशात

मोहिमेस जाणारे  दुसरे भारतीय अंतराळवीर ठरले आहेत. ग्रुप कॅप्टन शुक्ला यांनी खास भारतासाठी असे सात वैज्ञानिक प्रयोग केले. ॲक्सिओम ४ किंवा मिशन 'आकाश गंगा' हे भारताच्या गगनयान मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेसाठीचे पहिले ठोस पाऊल आहे.

**<u>महा</u>**

महाराष्ट्र राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका १ जुलै २०२५ पर्यंत अद्ययावत केलेल्या मतदार यादीच्या आधारे घेतल्या जातील असं महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगानं काल स्पष्ट केलं.

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दृक-श्राव्य माध्यमातून ही माहिती दिली. ते म्हणाले की, स्थानिक निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदार यादी तयार केली जाणार नाही, त्याऐवजी भारतीय निवडणूक आयोगाच्या याद्या वापरल्या जातील. वाघमारे यांनी अधिकाऱ्यांना, ज्येष्ठ नागरिक आणि विशेष अपंग मतदारांसाठी मतदान केंद्रे पुरेशा सुविधांनी सुसज्ज आहेत याची खात्री करण्याचे निर्देश दिले असून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची उपलब्धता आणि त्यांच्या कार्यक्षमतेचे मूल्यांकन करण्यावर भर दिला आहे.

कावड यात्रा

उत्तर भारतात, पवित्र श्रावण महिन्यात होणाऱ्या वार्षिक कावड यात्रेला आजपासून सुरुवात होत आहे. या तीर्थयात्रेदरम्यान, लाखो भाविक गंगा नदीचे पवित्र जल गोळा करण्यासाठी उत्तराखंडमधील हरिद्वार, गौमुख आणि गंगोत्री सारख्या पवित्र स्थळांना जातात. या यात्रेकरूंच्या व्यवस्थापनासाठी दिल्ली, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड सरकारने मोठ्या प्रमाणावर नियोजन केले आहे.

जन्म नागरी हक्क

अमेरिकेत बेकायदेशीर स्थलांतरित आणि परदेशी आगंतुक यांनी जन्म दिलेल्या बाळांना नागरिकत्वाचा अधिकार न देण्याचा अध्यक्ष डोनल्ड ट्रंप यांचा आदेश न्यूहँपशायरच्या एका न्यायाधीशांनी रोखून धरला आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेनुसार अमेरिकेत जन्मलेल्या सर्व बाळांना नागरिकत्वाची हमी दिलेली आहे. परंतु स्थलांतरितांवर अंकुश ठेवण्याच्या उद्देशानं ट्रंप यांनी हा अधिकार काढून घेणारा आदेश जारी केला होता. ट्रंप यांचा आदेश हानीकारक आणि घटनाबाह्य असल्याचं न्यायाधीशांनी सांगितलं.

स्थलांतरित पालक आणि त्यांच्या बालकांच्या वतीने अमेरिकन सिव्हिल लिबर्टीज युनियनने यासंदर्भात याचिका दाखल केली होती. दरम्यान, व्हाईट हाऊसने न्यायाधीशांच्या निर्णयाच्या वैधतेला आव्हान दिले असून, ट्रम्प प्रशासन, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प ज्या धोरणांच्या अंमलबजावणीसाठी निवडून आले, त्या धोरणांना विरोध करणाऱ्या जिल्हा न्यायाधीशांविरुद्ध जोमाने लढा देईल असं प्रवक्ते हॅरिसन फील्ड्स यांनी काल एका निवेदनात म्हटलं आहे.

अमेरिका-जपान

येत्या तीन आठवड्यात अमेरिकेकडून शुल्क आकारण्याच्या भीतीमुळे जपानने सुरक्षा, अन्न आणि ऊर्जा यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये अमेरिकेवरील अवलंबित्व संपवावे असे जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा

यांनी म्हटले आहे. अमेरिकेच्या शुल्क धोरणाचे अनुसरण करण्याऐवजी जपानने सुरक्षा, ऊर्जा आणि अन्न क्षेत्रात अधिक स्वावलंबी होण्याची आवश्यकता आहे. असं एका मुलाखतीत बोलताना पंतप्रधान इशिबा म्हणाले. अमेरिका १ ऑगस्टपासून जपानी आयातीवर २५ टक्के शुल्क लावणार असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी पंतप्रधान इशिबा यांना कळवलं आहे.

**<u>माणूस-हत्ती संघर्ष</u>**

मानव-हत्ती संघर्षाच्या वाढत्या समस्येला तोंड देण्यासाठी, आसाम सरकार उच्च जोखीम असलेल्या आठ जिल्ह्यांमध्ये गज मित्र योजना सुरू करणार आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, ८० संघर्षग्रस्त गावांमध्ये आठ स्थानिक सदस्यांसह समुदाय-आधारित जलद प्रतिसाद पथकं तैनात केली जातील. हत्तींची स्थलांतर प्रक्रिया सुरक्षितपणे व्हावी त्याचबरोबर स्थानिक उपजीविकेचे रक्षण करण्यासाठी, ही पथके तीव्र संघर्षाच्या महिन्यांत, विशेषतः भात लागवडीच्या हंगामादरम्यान काम करतील. या वर्षी १ ऑक्टोबरपासून गावप्रमुखांचे मानधन ९,००० रुपयांवरून १४,००० रुपये प्रति महिना करण्याचा प्रस्तावही आसाम मंत्रिमंडळाने मंजूर केला आहे.

**<u>अमरनाथ यात्रा</u>**

काश्मीरच्या खोऱ्यात अधून मधून सुरू असलेल्या पावसातही अमरनाथ यात्रा उत्साहात सुरू आहे. आतापर्यंत १ लाख ४५ हजारांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतले असून काल १७ हजारांहून अधिक यात्रेकरूंनी दर्शन घेतले. ही यात्रा ९ ऑगस्ट पर्यन्त चालेल.

**<u>केरळ निपाह</u>**

केरळमधील पलक्कड आणि मलप्पुरम जिल्ह्यातील निपा विषाणूबाबत अभ्यास करण्यासाठी पुण्यातील राष्ट्रीय संसर्गजन्यरोगशास्त्र संस्थेसह राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राचे शास्त्रज्ञ तिथं दौरा करत आहेत. दिलीप पाटील यांच्या नेतृत्वात एनआयवीचं पथक या जिल्ह्यातील वटवाघुळांचं सर्वेक्षण करेल. सध्या केरळमध्ये अंदाजे पाचशे लोकांची निपा विषाणूबाबत निगराणी करण्यात येत आहे.

**<u>दारुगोळा</u>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, लष्कराच्या रोमियो फोर्स आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप यांनी संयुक्तपणे केलेल्या मोहिमेत, काल पूंछ जिल्ह्यात एक दहशतवाद्यांचा अड्डा उध्वस्त करण्यात आला. या शोध मोहिमेत मोठ्या प्रमाणात शस्त्र, दारूगोळा आणि स्फोटके जप्त करण्यात आली. प्रदेशातील शांतता बिघडवण्याच्या उद्देशाने कट आखून जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा एकदा दहशतवाद सुरू करण्याच्या उद्देशाने शस्त्रास्त्रांच्या तस्करीच्या व्यापक नेटवर्कचा हा भाग असल्याचं मानलं जात असल्याचं सूत्रांनी सांगितलं. जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद नष्ट करण्याच्या सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये ही कारवाई म्हणजे आणखी एक यश आहे.

बुद्धिबळ

जॉर्जियामध्ये बातुमी इथं फिडे महिलांच्या विश्व बुद्धिबळ स्पर्धेत चार भारतीय खेळाडूंनी तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. सर्वोच्च मानांकित ग्रँडमास्टर कोनेरु हंपी, द्रोणवल्ली हरिका, आर. वैशाली आणि दिव्या देशमुख यांनी आपलं आव्हान राखलं आहे.

**विम्बल्डन**

विम्बल्डन टेनिसमध्ये आज पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत, अव्वल मानांकित यानिक सिनरचा सामना, आतापर्यंत २४ वेळा ग्रँडस्लम पदक जिंकलेल्या नोवाक जोकोविचशी  होणार आहे. तर, जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या कार्लोस अल्काराझची लढत टेलर फ्रिट्झशी होईल.

महिला एकेरी गटाच्या उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात  इगा स्वाटेकची लढत अमांडा अनिसिमोवाशी जेतेपदासाठी लढत होईल.

दरम्यान, चेक खेळाडू कॅटेरिना सिनियाकोवा आणि तिची जोडीदार नेदरलँड्सची सेम व्हर्बीक यांनी स्पर्धेतील मिश्र दुहेरीचे जेतेपद पटकावलं.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या  कसोटी सामन्यात काल लॉर्ड्स इथे  नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडचे सलामीवीर लवकर बाद झाले. दिवसअखेर सावध खेळ करत इंग्लंडच्या  संघाने  4 बाद 251  धावा केल्या होत्या. जो रूट 99 तर कर्णधार बेन स्टोक्स 39 धावांवर  खेळत आहेत. पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघ एक एक सामना जिंकून बरोबरीत आहेत.  यजमान इंग्लंड संघ आज भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता खेळायला सुरुवात करेल.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज पूर्व राजस्थान आणि मध्य प्रदेशातील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. दिल्ली, हरियाणा, चंदीगड, पंजाब, अरुणाचल प्रदेश, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, झारखंड आणि उत्तराखंडच्या काही भागातही दिवसभर मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवसांत उत्तर प्रदेश, गुजरात, किनारी आंध्र प्रदेश, पूर्व मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये वादळ आणि विजांची शक्यता वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार